सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १८ मार्च २०२६

आतील पानावर
पान २– भाईजानसोबत झळकणार दोन दाक्षिणात्य सुंदरी
पान ३– कंगनासोबतच्या भांडणावर तापसीने...
पान ४– दाक्षिणात्य 'क्वीन' त्रिशा कृष्णन पुन्हा चर्चेत
पान ५–'सालबर्डी'मध्ये ओंकार भोजने साकारणार उपसरपंच
पान ७– राणीचा 'मर्दानी ३' आता ओटीटीवर




# 'फोर्स'चा तिसरा भाग येणार

बॉलिवूडचा ॲक्शन स्टार जॉन अब्राहमच्या चाहत्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ज्या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची प्रेक्षक वाट पाहत होते, त्या 'फोर्स ३' चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. ॲक्शन आणि थ्रिलरने भरपूर असलेल्या या फ्रँचायझीचा तिसरा भाग आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष म्हणजे जॉनसोबत या सिनेमात मोठा सुपरस्टार झळकणार आहे.

'फोर्स ३' या चित्रपटात जॉन अब्राहमसोबत अभिनेता हर्षवर्धन राणे देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हर्षवर्धनने त्याच्या सोशल मीडिया हँडलवर चित्रपटाच्या 'मुहूर्त' सोहळ्याचा एक खास व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये चित्रपटाची संपूर्ण टीम उत्साहात दिसत असून, चित्रीकरणाला अधिकृतपणे सुरुवात झाल्याचे संकेत मिळाले आहेत. २०११ मध्ये आलेल्या 'फोर्स' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती, ज्यामध्ये जॉन अब्राहम आणि जिनिलिया डिसूझा मुख्य भूमिकेत होते. त्यानंतर २०१६ मध्ये 'फोर्स २' प्रदर्शित झाला, ज्यालाही प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

आता तब्बल १० वर्षांनंतर या सिनेमाचा तिसरा भाग येत असल्याने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. 'फोर्स ३' मध्ये जॉन अब्राहम पुन्हा एकदा पोलीस अधिकारी यशवर्धनच्या भूमिकेत दिसणार असल्याची शक्यता आहे. यावेळची ॲक्शन गेल्या दोन भागांच्या तुलनेत अधिक भव्य असेल, असा दावा निर्मात्यांकडून केला जात आहे. हर्षवर्धन राणेची या चित्रपटातील एन्ट्री ॲक्शन प्रेमींसाठी एक विशेष पर्वणी ठरणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही, परंतु चित्रीकरणाचा वेग पाहता हा चित्रपट २०२७ च्या सुरुवातीला प्रदर्शित होऊ शकतो असा अंदाज वर्तवला जात आहे. जॉन अब्राहमचे फॅन्स सोशल मीडियावर 'एसीपी यशवर्धन इज बॅक' अशा कमेंट्स करून आपला आनंद व्यक्त करत आहेत.



# आमिर खानच्या सिनेमातून तब्बूला केलं होतं आऊट

बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेत्रींच्या यादीत आवर्जुन नाव घेतलं जातं ते तब्बूचं. आजवरच्या कारकिर्दीत तिने अनेक गाजलेल्या भूमिका केल्या. त्यामुळे इंडस्ट्रीत तिच्या नावाचा दबदबा आहे. अनेक सुपरहिट सिनेमे दिलेल्या या अभिनेत्रीला मात्र एकदा चांगलचं अपमानित करण्यात आलं होतं. एका मुलाखतीमध्ये तिने तिच्यावर बेतलेला हा प्रसंग सांगितला. तब्बूने तिच्या करिअरची सुरुवात दाक्षिणात्य कलाविश्वातून केली. कुली नंबर १ या तेलुगू सिनेमातून तिने इंडस्ट्रीत पदार्पण केलं. त्यानंतर तिने माशूक, विजयपथ, प्रेम, साजन की बाहों मे अशा अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं. त्यामुळे साऊथसह बॉलिवूडमध्येही ती लोकप्रिय झाली. मात्र, लोकप्रियतेच्या शिखरावर असतांनाच तिला अभिनेता आमिर खानच्या एका सिनेमातून बाहेरचा रस्ता दाखवला होता. १९९९ साली आलेल्या 'मन' या चित्रपटात तब्बूला कास्ट करण्यात आलं होतं. पण अचानक तब्बूला बाहेरचा रस्ता दाखवला गेला. तिच्याजागी मनीषा कोईरालाची एन्ट्री झाली. एका मुलाखतीमध्ये तब्बूने यावर भाष्य केलं. आमिरसोबत काम करायला मिळणार म्हणून मी खूप आनंदी होते. 'मन' चित्रपटासाठी फोटोशूटही झालं होतं. यानंतर काय झालं मला माहित नाही. पण मला सिनेमातून काढून टाकण्यात आलं. माझ्या मते, असा गेम बहुतेक अभिनेत्रींसोबत होतो, असं ती म्हणाली होती. इतकंच नाही तर मन या सिनेमाशिवाय तिला गोविंदाच्या 'कुंवारा' या सिनेमातूनही ऐनवेळी काढून टाकलं होतं. या सिनेमात तिच्या जागी उर्मिला मातोंडकरची वर्णी लागली होती. चीचीसोबत 'कुंवारा' करायला मिळाला असता तर मज्जा आली असती. पण मला खूप खंत वाटते या सगळ्याची. मला खूप अपमान सहन करावा लागला. अर्थात माझ्या मनात कोणाबद्दलही कुठलाही राग नाही, असंही ती यावेळी म्हणाली होती.




# 'क्रिश ४'मध्ये दिसणार प्रियांका चोप्रा

दीर्घकाळापासून बॉलिवूडपासून दूर राहिलेली अभिनेत्री प्रियांका चोप्रा आता भारतीय प्रेक्षकांच्या पुन्हा भेटीला येणार आहे. प्रियांका ही आता ऋतिक रोशनसोबत 'कृष ४' चित्रपटात मुख्य भूमिकेत असणार आहे. प्रियांका चोप्रा ही कृष फ्रेंचाइजीच्या दोन चित्रपटांमध्ये मुख्य नायिका राहिली आहे. प्रियांकाने यापूर्वी दोन चित्रपटांमध्ये ऋतिक रोशनसोबत महत्त्वाची भूमिका साकारली आहे. प्रेक्षकांनी तिच्या आणि ऋतिकच्या केमिस्ट्रीला पसंतीही दिली आहे. ऋतिक हा कृष ४ मध्ये अभिनय करण्यासोबत याचे दिग्दर्शनही करणार आहे. त्याच्या दिग्दर्शनातील हा पहिलाच चित्रपट असणार आहे. यामुळे ऋतिक कॅमेऱ्यामागून गोष्टी कशा सांभाळतो हे पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. प्रियांका यापूर्वी 'द स्काय इज पिंक' या चित्रपटात दिसून आली होती. यात तिच्यासोबत फरहान अख्तर आणि जायरा वसीम हे कलाकार दिसून आले होते. यानंतर तिने हॉलिवूडमध्ये काम करण्यास प्राधान्य दिले होते. प्रियांका लवकरच 'वाराणसी' चित्रपटाद्वारे भारतीय चित्रपटसृष्टीत परतणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत दाक्षिणात्य सुपरस्टार महेशबाबू मुख्य भूमिकेत असणार आहे.

# भाईजानसोबत झळकणार दोन दाक्षिणात्य सुंदरी

अभिनेता सलमान खान सध्या बिग बजेट चित्रपटांच्या तयारीत आहे. 'सिकंदर'मध्ये रश्मिका मंदान्नासोबत काम केल्यानंतर आता सलमान खान आणखी दोन दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेत्रीसोबत स्क्रीन शेअर करणार असल्याची चर्चा आहे. या दोन दाक्षिणात्य अभिनेत्री नयनतारा आणि समांथा असल्याचं बोललं जात आहे. २०२३ मध्ये 'जवान' या ब्लॉकबस्टर चित्रपटाद्वारे नयनताराने बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवले होते. या चित्रपटानंतर तिने कोणताही हिंदी चित्रपट स्वीकारण्याची घाई केली नव्हती. मात्र, आता ती सलमान खानसोबत एका पॅन इंडिया चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार असल्याचे वृत्त आहे. रिपोर्टनुसार, या चित्रपटात सलमान आणि नयनताराची जोडी पहिल्यांदाच पडद्यावर रोमान्स करताना दिसेल. या भव्य चित्रपटाचे दिग्दर्शन दाक्षिणात्य प्रसिद्ध दिग्दर्शक वामशी पैदिपल्ली करणार असून, दिल राजू यांच्या निर्मिती संस्थेअंतर्गत हा चित्रपट साकारला जाणार आहे.

वामशी पैदिपल्ली यांचा हा पहिलाच हिंदी चित्रपट असेल. विशेष म्हणजे, या चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रूथ प्रभू देखील एका महत्त्वाच्या भूमिकेत असू शकते, अशी चर्चा आहे. सलमान खान सध्या त्याच्या 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. या चित्रपटाचे काम पूर्ण होताच तो नयनतारासोबतच्या या नवीन चित्रपटाचे शूटिंग सुरू करेल. हिंदी आणि दाक्षिणात्य अनेक दिग्गज कलाकार या चित्रपटाचा भाग असणार आहेत, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.









# नाना पाटेकर व अनिल कपूर 'या' सिनेमातून पुन्हा भेटीला

'वेलकम' हा चित्रपट चांगलाच गाजला होता. अनिस बज्मी यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले होते. २००७ ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात अनेक लोकप्रिय कलाकार दिसले होते. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगलीच पसंती मिळाली होती. या चित्रपटात मजनू आणि उदयभाई या पात्रांचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले. ही पात्रे अनिल कपूर आणि नाना पाटेकर यांनी साकारली होती. त्यानंतर वेलकम बॅक या सिनेमालादेखील प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता लवकरच वेलकम टू द जंगल हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामध्ये अनेक कलाकार दिसणार आहेत. मात्र, नाना पाटेकर आणि अनिल कपूर या सिनेमात दिसणार नाहीत. जेव्हा चित्रपटात कोण दिसणार आहे, हे समोर आले तेव्हा अनेकांनी त्याबद्दल प्रश्न विचारले होते. चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. आता जून २०२६ मध्ये वेलकम टू द जंगल हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वेलकम फ्रँचायजीचा हा तिसरा चित्रपट आहे. पहिल्या दोन्ही सिनेमांना प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता वेलकम टू जंगल हा सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वीच 'वेलकम ४'ची स्क्रिप्ट पूर्ण झाली असल्याचेही समोर आले आहे. विशेष म्हणजे जरी 'वेलकम टू द जंगल'मध्ये नाना पाटेकर आणि अनिल कपूर नसले तरी 'वेलकम ४'मध्ये हे दोन्ही कलाकार महत्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. रिपोर्टनुसार, 'वेलकम टू द जंगल'पेक्षा 'वेलकम ४'ची गोष्ट ही पूर्णपणे वेगळी असणार आहे. नाना पाटेकर, परेश रावल व अनिल कपूर यांच्या भूमिका मध्यवर्ती असणार आहेत. परेश रावल जरी 'वेलकम टू जंगल'मध्ये महत्त्वाच्या भूमिकेत असले तरी ते यामध्ये डॉक्टर घुंगरू या भूमिकेत दिसणार नाहीत. डॉक्टर घुंगरू ही भूमिका त्यांनी २०१५ ला प्रदर्शित झालेल्या वेलकम बॅक या सिनेमात साकारली होती. 'वेलकम बॅक'मध्ये नाना पाटेकर व अनिल कपूर यांनी 'वेलकम' सिनेमाप्रमाणेच उदयभाई व मजनूभाई भूमिका साकारली होती. मात्र, अक्षय कुमार व कतरिना कैफऐवजी जॉन अब्राहम व श्रुती हसन दिसले होते. डिंपल कपाडिया व नसिरुद्दीन शाह हे कलाकारदेखील 'वेलकम बॅक'मध्ये दिसले होते. 'वेलकम ४'मध्ये अनेक डॉन दिसणार आहेत. 'वेलकम टू द जंगल'मध्ये जॅकी श्रॉफ, रवीना टंडन, अर्शद वारसी, तुषार कपूर असे कलाकार दिसणार आहेत.

# श्रेयाने ट्रोलिंगनंतर करीनाच्या या गाण्याला दिला नकार



श्रेया घोषाल बॉलीवूडमधील लोकप्रिय गायिका आहे. तिनं अनेक प्रादेशिक भाषांत गाणी गात रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं आहे. पण, जे प्रेक्षक प्रेम करतात ते कधी कधी कलाकारांना ट्रोलही करतात. असंच काहीसं श्रेयाबरोबर झाले आहे. तिलाही एका गाण्यासाठी ट्रोल करण्यात आलं होतं. त्यानंतर तिनं करीना कपूरच्या चित्रपटातील गाणं गायला चक्क नकार दिल्याचं म्हटलं जातं. श्रेया घोषालनं तिच्या गाण्यामुळे झालेल्या ट्रोलिंगबद्दल स्पष्टीकरण देताना सांगितलं आहे. एका मुलाखतीत श्रेयाला तुला 'चिकनी चमेली'च्या वेळी ट्रोल करण्यात आलेलं. तेव्हा तू काहीतरी वादग्रस्त विधानही केलेलं, असं विचारल्यानंतर ती म्हणाली, मी ट्रोल झाले होते? मला तर माहीतच नाही. श्रेया पुढे म्हणाली, मी प्रामाणिकपणे सांगते मी काही वादग्रस्त बोलले नव्हते. मी म्हणाले होते की, मी लहान मुलांसमोर ते गाणं गाऊ शकत नाही. मला नाही योग्य वाटत. पण, चिकनी चमेली अश्लील वगैरे असं काही गाणं नव्हतं. श्रेया पुढे म्हणाली, त्यानंतर मला तशा किंबहुना त्यापेक्षाही अधिक जास्त उच्चार न करता येणाऱ्या किंवा संकोच वाटेल असे शब्द असलेल्या गाण्यांसाठी विचारणा झालेली. चिकन बनवून खा वगैरे शब्द त्यात होते. पण, मी म्हटलं की, मी हे नाही करू शकत. पण, चिकनी चमेली या गाण्यानं मला खूप लोकप्रियता मिळाली. ते गाणं खरं तर खूप वेगळं होतं आणि तेव्हा मला तितकी अक्कलही नव्हती की, याचा काय अर्थ आहे; पण आता मी विचारपूर्वक निर्णय घेते. श्रेयानं उल्लेख केलेलं गाणं माध्यमांच्या वृत्तानुसार करीना कपूर व सलमान खान यांच्या 'फेविकॉल से' हे गाणं असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. २०१२ साली आलेल्या 'दबंग २' चित्रटपटातील हे गाणं गाण्यासाठी 'चिकनी चमेली'मुळे झालेल्या टीकेनंतर श्रेयानं गायला नकार दिल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान, २०१२ सालीच आलेल्या 'अग्निपथ' या चित्रपटातील चिकनी चमेली हे लोकप्रिय गाणं असून, कतरिना कैफनं त्यामधून तिच्या नृत्यानं अनेकांचं लक्ष वेधलं होतं. 'चिकनी चमेली' हे कतरिनाच्याही हिट गाण्यांपैकी एक आहे. हृतिक रोशन व कतरिना कैफ यामध्ये मुख्य भूमिकात होते; तर अजय-अतुल यांनी हे गाणं संगीतबद्ध केलं होतं.



# कंगनासोबतच्या भांडणावर तापसीने सोडले मौन



तापसी पन्नू आणि कंगना रणौत या दोन बॉलिवूड अभिनेत्री आहेत ज्या बाहेरच्या असूनही त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. दोघीही त्यांच्या दमदार अभिनयासाठी चर्चेत आहेत. तथापि, त्यांच्यातील भांडण दीर्घकाळ चालले आहे आणि वारंवार चर्चेत आहे. तापसी पन्नू म्हणते की तिच्याकडून कोणताही संघर्ष किंवा वैर नाही. शिवाय, ती कंगनाला तिच्यापेक्षा वरिष्ठ मानते आणि तिच्याशी मैत्री करण्यासही तयार आहे.

शुभंकर मिश्रा यांच्या पॉडकास्टवरील संभाषणादरम्यान, तापसी पन्नूने कंगना राणौतसोबतच्या तिच्या भांडणाला संबोधित केले, जे तिच्या बहिणीने तिला स्वस्त प्रत, बी-ग्रेड अभिनेत्री आणि शी-मॅन असे संबोधल्यानंतर सुरू झाले. तापसी आता म्हणते की तिने कधीही भांडण सुरू केले नाही आणि ती पुढे जाण्यास तयार आहे. अभिनेत्री म्हणाली, मला माहित नाही की मी कधी भांडलव आहे की नाही. जेव्हा दोन लोक एकमेकांशी भांडतात तेव्हा भांडण होते. मी कधीच केले नाही. मला सांगा, मी कधी तिच्याविरुद्ध एकही शब्द बोललो आहे का? जिथे मी तिच्याविरुद्ध काही बोलले आहे तिथे मला दाखवा. कंगना स्वस्त कॉपी असल्याबद्दल कंगनाच्या टिप्पणीबद्दल तापसी म्हणाली की तिच्या बहिणीने तिला स्वस्त कॉपी म्हटले. तिने म्हटले की ती येथे जास्त कमाई करत नसल्याने ती स्वस्त आहे. जर ती (कंगना राणावत) इतकी प्रतिभावान अभिनेत्री असेल तर तिला कॉपी म्हणण्यास हरकत नाही. तुम्ही माझे कोणतेही विधान घेऊ शकता; मी तिच्याविरुद्ध काहीही बोललो नाही. संभाषणादरम्यान, जेव्हा असे सुचवण्यात आले की जर तापसी पन्नू आणि कंगना राणौत सारख्या दोन प्रतिभावान अभिनेत्री एकत्र आल्या तर ते खरोखरच आश्चर्यकारक होईल, तेव्हा तापसी पन्नू म्हणाली, हे निश्चितच शक्य आहे.

कदाचित कोणाला दोन महान अभिनेत्री एकत्र काम करायचे नसेल. मला माहित नाही की कोणी त्यांना काय सांगितले आहे. आम्ही दोघेही बाहेरचे आहोत, तरी आम्ही दोघेही एकच गोष्ट म्हणतो. कंगनाशी मैत्री करण्याबद्दल विचारले असता, तापसी पन्नू स्पष्टपणे म्हणाली, मी तयार आहे. ती (कंगना) माझी वरिष्ठ आहे आणि मला तिच्यासोबत काम करण्यास किंवा तिच्याशी मैत्री करण्यास कोणतीही अडचण नाही. तथापि, तापसी म्हणाली की कंगना तिला काय म्हणेल याची ती हमी देऊ शकत नाही, परंतु तिची भूमिका स्पष्ट आहे. तापसी पन्नूचा अस्सी चित्रपटगृहात आहे.



# ६३ वर्षांच्या दाक्षिणात्य अभिनेत्रीचे कमबॅक



दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत सध्या एक नाव चर्चेत आहे. राधिका सारथकुमार. ६३ वर्षीय या दिग्गज अभिनेत्रीने नवीन तमिळ चित्रपट 'ताई किझवी'तून जबरदस्त कमबॅक केले आहे. हा चित्रपट फक्त हिटच नाही तर सुपरहिट ठरला असून, मोठ्या स्टार्स आणि भव्य बजेटच्या चित्रपटांनाही मागे टाकत आहे. चित्रपटाची कथा आणि अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'ताई किझवी' चित्रपटात चांगली कथा, उत्तम दिग्दर्शन आणि प्रामाणिक अभिनय असल्याने हेच चित्रपटाला यश मिळण्याचे कारण आहे. हा चित्रपट प्रेक्षकांच्या भावनांना हात घालतो. कधी हसवतो, कधी रडवतो आणि कधी विचार करायला भाग पाडतो. चित्रपटात अभिनेत्री राधिका सारथकुमार या ज्येष्ठ अभिनेत्रीने एका ७० वर्षीय महिलेची (पावुनुथाई) भूमिका साकारली आहे. तिची मुले तिच्या मालमत्तेच्या वारसासाठी धडपडतात. यावर कथा तयार करण्यात आली असून, या कथेत अनेक वळणं, भावनिक क्षण आणि ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारित कॉमेडी-ड्रामा दाखवण्यात आला आहे. राधिकाच्या जबरदस्त परफॉर्मन्सने प्रेक्षकांना खेळवून ठेवले आहे. बॉक्स ऑफिसवर चित्रपटाने धडाकेबाज कामगिरी केली आहे. हा चित्रपट नुकताच रिलीज झाला आहे. पहिल्याच दिवशी २.६५ कोटी रुपयांची कमाई चित्रपटाने केली आहे. तर १० दिवसांत जगभरात ५० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. दुसऱ्या आठवड्यातही मजबूत कामगिरी करत सुमारे ५ कोटीहून अधिकची कमाई चित्रपटाने केली आहे. राधिका सारथकुमार या तमिळ, तेलुगू आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री आहेत. अभिनेत्रीने 'नसीब अपना अपना' (ऋषी कपूरसोबत चंदाची भूमिका), 'हिम्मतवाला', 'लाल बादशाह', 'आज का अर्जुन' यांसारख्या चित्रपटात अभिनय केला आहे. तमिळमध्ये 'किझक्के पोगम रेल', 'धर्म देवथाई' यांसारखे चित्रपटही नावावर आहेत. यामध्ये अभिनेत्रीचा वृद्धावस्थेतील लूक आणि अभिनयाने सर्वांना प्रभावित केले आहे.



# कमल हासन यांनी घेतल बिगबींपेक्षा जास्त मानधन

दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील कलाकार, दिग्दर्शक हे त्यांचा वेगळ्या धाटणीचा विषय आणि मांडणी यांसाठी ओळखले जातात. बॉलीवूडप्रमाणे त्यांचे चित्रपटही कोट्यवधींच्या बजेटमध्ये बनवले जातात. तर तेथील कलाकारही त्यासाठी कोट्यवधींमध्ये मानधन घेतात. पण, एका दाक्षिणात्य अभिनेत्यानं फक्त २० दिवसांसाठी कोट्यवधींचं मानधन घेतलं होतं आणि ते देशातील सर्वाधिक मानधन घेणार कलाकार ठरले. नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटात प्रभास, दीपिका पादुकोण, अमिताभ बच्चन, कमल हासन यांसारखे लोकप्रिय कलाकार झळकले होते. अमिताभ बच्चन यांच्या कामाचं अनेकांनी कौतुक केलं. पण, यातीलच अजून एका अभिनेत्यानं सर्वांचं लक्ष वेधलं आणि ते अभिनेते आहेत कमल हासन. २०२४ मधील हा ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला होता. एकट्या कमल हासन यांनीच या चित्रपटासाठी कोट्यवधींचं मानधन घेतलं. फिल्ममेकर व अभिनेते योगी सेथु म्हणाले, कमलसरांना २० दिवसांसाठी १५० कोटी रुपये देण्यात आलेले. मी त्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी म्हटलेलं की, तुम्ही सर्वाधिक मानधन घेणारे कलाकार आहात, जे दिवसाला एक कोटी रुपये घेत होते. सेथु यांनी पुढे सांगितलं की, कमल हासन यांनी कल्की या चित्रपटाच्या निर्मात्यांशी त्याची भेट घडवून दिली. तेव्हा सेथु यांनी कमल हासन यांना सर्वाधिक मानधन घेणारे कलाकार बनवल्यानिमित्त निर्मात्यांचे आभार मानले होते, असं म्हटलं. त्यावेळी निर्माते सेथु यांना कमल यांनी २० नाही, तर फक्त १० दिवस दिले होते शूटिंगसाठी, असं सांगितलं. त्यावर सेथु म्हणाले की, मग तर तो दिवसाला दोन कोटी घेतो. 'कल्की' चित्रपटात कमल यांनी यासकीन हे पात्र साकारलेलं. हे पात्र 'कॉम्प्लेक्स' नावाच्या एका दुष्ट, हुकूमशाही सत्तेखालील जगावर राज्य करणारा सर्वेसर्वा देव-राजा म्हणून दाखवण्यात आला आहे. चित्रपटात त्यांचा स्क्रीन टाइम मर्यादित असला तरी कथानकात त्यांच्या पात्राला अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. चित्रपटाच्या शेवटी दिलेल्या संकेतांवरून पुढील भागात त्यांच्या भूमिकेचा आवाका मोठा असल्याचे स्पष्ट होते. 'कल्की'च्या सीक्वेलवर काम सुरू झालं आहे. अमिताभ यांनी कमल हासनबरोबरचे सेटवरील फोटो शेअर केले असून, बऱ्याच वर्षांनंतर एकत्र काम करत असल्याचे त्यांनी नमूद केलं आहे.

# दाक्षिणात्य 'क्वीन' त्रिशा कृष्णन पुन्हा चर्चेत



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री त्रिशा कृष्णन सध्या पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तमिळ सुपरस्टार थलपती विजय याच्या वैयक्तिक आयुष्याशी तिचं नाव जोडलं जात असल्यामुळे सोशल मीडियावर आणि मनोरंजन विश्वात अनेक चर्चा रंगल्या आहेत. विजयच्या पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज केल्याची बातमी समोर आल्यानंतर या चर्चांना अधिकच उधाण आलं आहे. त्रिशा कृष्णनचा जन्म ४ मे १९८३ रोजी चेन्नई येथे झाला. तिने चेन्नईतील एथिराज कॉलेजमधून बीबीएचे शिक्षण पूर्ण केले आहे. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी त्रिशाने मॉडेलिंगमध्ये आपली ओळख निर्माण केली. १९९९ साली तिने 'मिस मद्रास' हा किताब जिंकला आणि तिथूनच तिच्या करिअरला वेगळी दिशा मिळाली. त्रिशाने आपल्या करिअरची सुरुवात छोट्या भूमिकेतून केली. १९९९ मध्ये आलेल्या 'जोडी' या चित्रपटात ती झळकली होती. त्यानंतर २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मौनम पेसियाधे' या चित्रपटातून ती मुख्य अभिनेत्री म्हणून प्रेक्षकांसमोर आली. या चित्रपटानंतर त्रिशाला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळू लागली. यानंतर तिने अनेक यशस्वी चित्रपटांमध्ये काम केले. 'घिल्ली' या चित्रपटात तिने थलपती विजयसोबत काम केले होते आणि हा चित्रपट सुपरहिट ठरला. त्यानंतर 'तिरुपाची', 'आथी', 'कुरुवी' आणि अलीकडील 'लिओ' या चित्रपटांमध्येही विजय आणि त्रिशा एकत्र दिसले. काही काळ त्यांनी एकत्र काम केले नव्हते, मात्र 'लिओ'नंतर दोघांबद्दलच्या चर्चांना पुन्हा सुरुवात झाली. त्रिशाला '९६' या चित्रपटातील 'जानू' या भूमिकेमुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली. तसेच 'पोन्नियिन सेल्वन १' आणि 'पोन्नियिन सेल्वन २' या ऐतिहासिक चित्रपटांमध्ये तिने साकारलेली राजकुमारीची भूमिका देखील प्रेक्षकांना खूप आवडली. अभिनयासोबतच तिच्या व्यक्तिमत्त्वामुळेही ती दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. त्रिशाने हिंदी चित्रपटसृष्टीतही पाऊल ठेवले आहे. तिने अभिनेता अक्षय कुमारसोबत 'खट्टा मीठा' या चित्रपटात काम केले होते. या चित्रपटातून तिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर त्रिशा सध्या ४२ वर्षांची आहे आणि अजूनही अविवाहित आहे. २०१५ साली तिचा बिझनेसमन वरुण मनियन याच्याशी साखरपुडा झाला होता. मात्र काही कारणांमुळे हा साखरपुडा मोडला. तसेच तिचं नाव अभिनेता राणा दग्गुबाती याच्याशीही जोडले गेले होते. दरम्यान, थलपती विजयच्या पत्नी संगीता सोर्नालिंगम हिने घटस्फोटासाठी अर्ज दाखल करत विजयचे एका अभिनेत्रीशी अफेअर असल्याचा आरोप केला आहे. या आरोपांनंतर काही दिवसांतच विजय आणि त्रिशा एका लग्नाच्या रिसेप्शनला एकत्र दिसले. दोघांनी एकसारखे कपडे घातले होते, त्यामुळे सोशल मीडियावर चर्चांना अधिक उधाण आले. मात्र या सगळ्या चर्चांवर अद्याप थलपती विजय किंवा त्रिशा कृष्णन यांनी कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे या अफेअरच्या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.




# ‘घबाडकुंड’मध्ये कलाकारांची मांदियाळी

अभिनेत्री आजवर आपण हॉलीवूड आणि बॉलीवूडमध्ये ‘युनिव्हर्स’ संकल्पनेवर आधारित अनेक चित्रपट पाहिलेले आहेत. पण, आता मराठीत सुद्धा हा प्रयोग पहिल्यांदाच यशस्वीरित्या साकारण्यात आला आहे. हा अनोखा प्रयत्न ‘घबाडकुंड’ या आगामी मराठी चित्रपटाच्या निमित्ताने मराठीत पहिल्यांदाच होतोय. अनेक कथा, रहस्य आणि पात्रं यांना एकाच धाग्यात गुंफणारा हा अनोखा प्रयोग प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे. ‘घबाडकुंड’ हा चित्रपट येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘अल्याड पल्याड’ चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील ‘घबाडकुंड’ सिनेमा प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत. आयुष्यात अनपेक्षित घटनांनी काहींच्या स्वप्नांना पंख फुटतात, पण त्याचवेळी पडद्यामागे सुरू असतो संशय आणि संकटांचा भयानक खेळ. भीती आणि अनिश्चिततेच्या छायेत घडणाऱ्या अकल्पित घटनांमुळे कथानक प्रत्येक टप्प्यावर नवे प्रश्न उभं करतं. सत्याच्या शोधात निघालेल्यांना कोणत्या गोष्टीला सामोरं जावं लागतंय? आणि शेवटी नशीब जिंकतं की माणूस? याची उत्कंठा वाढविणारा चित्रपट म्हणजेच ‘घबाडकुंड’. देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे, प्राजक्ता हनम घर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, योगेश प्रकाश तनपुरे, साहिल अनलदेवर आदी कलाकारांची दमदार फौज ‘घबाडकुंड’ चित्रपटात आहे. ‘घबाडकुंड’ची रिलीज डेट आणि चित्रपटाचा ‘फर्स्ट लूक’ नुकताच एका शानदार सोहळ्यात प्रदर्शित करण्यात आला. याप्रसंगी निर्माते रसिक कदम म्हणाले, घबाडकुंड’ हा एक वेगळा आणि रोमहर्षक अनुभव असणार आहे. उत्तम कथानक, दर्जेदार सादरीकरण आणि कलाकारांचा जबरदस्त अभिनय या सगळ्यांचा उत्तम संगम या चित्रपटात पहायला मिळेल. १९ जूनला हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येणार असून, त्यांना नक्कीच एक वेगळी आणि थरारक कथा पाहायला मिळेल याची आम्हाला खात्री आहे. हा चित्रपट मराठीसह दाक्षिणात्य भाषांमध्ये सुद्धा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने ते स्वप्न साकार होत आहे, याचा विशेष आनंद आहे. नव्या पिढीच्या आवडीचा विचार करूनच हा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला आहे असं मत दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं आहे.

# ‘बोल बोल राणी’ लवकरच होणार प्रदर्शित




सिड विंचुरकर निर्मित, दिग्दर्शित ‘बोल बोल राणी’ या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली असून येत्या १० जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. सोशल मीडियावर प्रदर्शित झालेल्या काही सेकंदांच्या व्हिडिओमध्ये रहस्य आणि उत्सुकतेचं जबरदस्त मिश्रण पाहायला मिळतं. खुर्चीत बसलेली एक तरुणी, बांधलेले हात, पार्श्वभूमीला घोंगावणारं रहस्यमयी संगीत आणि बंदुकीतून सुटलेली गोळी या सगळ्यामुळे ‘नेमकं घडलंय तरी काय?’ असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात निर्माण होत आहे. या व्हिडिओमुळे चित्रपटाच्या कथेबाबत कोणताही थेट उलगडा होत नसला, तरी त्यात दडलेली अस्वस्थ करणारी शांतता आणि थरारक वातावरण चित्रपट एका वेगळ्याच पातळीवर नेणार असल्याचं स्पष्ट होतं. विशेष म्हणजे पंधरा वर्षांनंतर सुबोध भावे, सई ताम्हणकर आणि चिन्मय मांडलेकर हे तीन दमदार कलाकार एकत्र झळकणार असल्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. त्यांच्यासोबत संभाजी ससाणेही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. नेमकी ही मुलगी कोण? तिचे हात का बांधलेले आहेत? गोळी कुणासाठी आहे? आणि या सगळ्यामागे कोणतं सत्य दडलं आहे? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी प्रेक्षक आतापासूनच चर्चेत रंगू लागले आहेत. न्यूझिलंड मोशन पिक्चर्स आणि फिफ्टी टू फ्रायडे निर्मित या चित्रपटाचे अपूर्वा मोतीवाले सहाय, सिड विंचुरकर आणि अमित भानुशाली निर्माते आहेत. यश मोदी, शब्बीर सबुवाला, रचना वोरा सहनिर्माते असून तपन विचारे, यश राम शाहानी, आयुष कृप्लानी असोसिएट निर्माते आहेत. ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे या चित्रपटाला संगीत लाभले आहे. रहस्यमयी कथानक, तगडी स्टारकास्ट आणि वेगळ्या मांडणीमुळे ‘बोल बोल राणी’ हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय बनत आहे.

गावच्या राजकारणात सरपंच आणि उपसरपंच यांच्यातील नोक-झोक नेहमीच चर्चेचा विषय ठरते. आता ही रंगत प्रेक्षकांना पडद्यावर पहायला मिळणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील अनुभवी अभिनेते शशांक शेंडे आणि आपल्या खास विनोदी अंदाजासाठी ओळखला जाणारा ओंकार भोजने हे दोघे सरपंच आणि उपसरपंचांच्या भूमिकेत आमने- सामने येणार आहेत. आगामी ‘सालबर्डी’ चित्रपटातील ग्रामीण पार्श्वभूमीवर घडणार्या कथेत शशांक शेंडे सरपंच गणपत पाटील तर ओंकार भोजने उपसरपंच मुकिंदा थोरात या दमदार व्यक्तिरेखा साकारणार आहेत. या दोघांच्या संवादांमधील चुरस, एकमेकांवरची टोलेबाजी आणि गावातील राजकारणातून निर्माण होणारे प्रसंग कथेला वेगळीच रंगत देणार आहेत. येत्या १७ एप्रिलला ‘सालबर्डी’ चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या भूमिकेविषयी बोलताना शशांक शेंडे म्हणाले, ‘सालबर्डी’ची कथा रहस्यमय आहे. स्थानिक पातळीवरचे राजकारण आणि एकमेकांसोबत असलेल्या नातेसंबंधांची झलक यामध्ये पहाता येईल. ही भूमिका करताना ओंकार सोबत झालेले ट्युनिंग आणि आम्ही साकारलेली भूमिका पडद्यावर पाहणं रंजक असणार आहे. ओंकार भोजने म्हणाला, उपसरपंच मुकिंदा थोरात ही भूमिका खूप रंगतदार आहे. शशांक सरांसारख्या अनुभवी कलाकारासोबत काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. प्रेक्षकांना ही जुगलबंदी नक्कीच आवडेल. महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या ‘सालबर्डी’ गावात घडणार्या रहस्यमय आणि अस्वस्थ करणार्या घटनांचा थरारक शोध घेणारा हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे. ‘सालबर्डी’ चित्रपटात शशांक शेंडे, ओंकार भोजने यांच्यासोबत पूजा सावंत, भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर आदि कलाकारांच्या भूमिका आहेत.

# ‘सालबर्डी’मध्ये ओंकार भोजने साकारणार उपसरपंच



रंगमंच

प्रा. अजित देवळाळे
सोलापूर ९१९८५००९२९७५

# सरला आवडता अंधार सरला तो चित्रपटांचा सुवर्णकाळ



त्याकाळात नवीन चित्रपट लागला की आमच्या मित्रमंडळींच्या गप्पांचा विषय फक्त तोच असायचा. फर्स्ट डे, फर्स्ट शो हा आमचा अभिमानाचा विषय असायचा. आवडत्या कलाकाराचा चित्रपट रिलीज झाला की कॉलेज सुटल्यावर थेट थिएटरकडे धाव घ्यायची. तिकीट मिळवण्यासाठी रांगेत उभे राहणे, खिडकीजवळ सरकण्यासाठी धडपड करणे, आणि अचानक हाऊसफुलचा बोर्ड लागलेला पाहणे, ही सारी धावपळ आजही डोळ्यासमोर जिवंत आहे.

अनेकदा तिकीट मिळत नसे. पण चित्रपट पाहण्याची जिद्द एवढी असायची की थिएटरच्या बाहेर दबक्या आवाजात तिकीट आहे दोन-तीन? असे विचारणाऱ्या मुलांकडे आम्ही वळायचो. जास्त पैसे देऊन ब्लॅकमध्ये तिकीट घेणे हा आमच्यासाठी गुन्हा नव्हता; तो एक थरार होता. त्या अतिरिक्त पैशाचे दु:ख वाटायचे नाही. उलट तिकीट हातात आल्यावर मिळणारा आनंद अमूल्य असायचा. जणू एखादे युद्ध जिंकले आहे, अशी भावना असायची. त्या काळात पडद्यावर राज्य करणारे तारे आमच्या आयुष्याचा भाग झाले होते. शाहरुख खानचा कुछ कुछ होता है, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, आणि बाज़ीगर पाहताना प्रेम, मैत्री आणि भावनांची नवी दुनिया आमच्यासमोर उलगडायची. त्यांचे संवाद, त्यांची स्टाईल, त्याची हात पसरून उभे राहण्याची अदा हे सगळे आमच्या मनावर कोरले गेले होते.

अमिताभ बच्चनचा शाहेशाह पाहताना अंगात वेगळीच ताकद संचारायची. रिश्ते में तो हम तुम्हारे बाप लगते हैं हा संवाद थिएटरमध्ये टाळ्यांच्या कडकडाटात हरवून जायचा. पुढे देवदाससारख्या चित्रपटांनी प्रेमाची वेदना काय असते, हेही शिकवले. अजय देवगनचा दिलवाले, हम दिल दे चुके सनम, सलमान खानचा हम आपके हैं कौन..!, आणि हृतिक रोशनचा कहो ना... प्यार है या चित्रपटांनी आमच्या तरुण मनांवर अक्षरशः जादू केली होती. प्रत्येक हिरो आमच्यासाठी आदर्श होता; प्रत्येक गाणे आमच्या आयुष्याचा साउंडट्रॅक बनले होते. आम्ही कॉलेजचे मित्र मिळून चित्रपट पाहायला जायचो. टीटीएमएम म्हणजे तुझं तुझं, माझं मी या पद्धतीने पैसे गोळा करायचो. कोणी तिकीटासाठी जादा पैसे द्यायचा, कोणी खाऊ आणायचा, तर कोणी पुढच्या शोसाठी आधीच माहिती गोळा करायचा. थिएटरमध्ये प्रवेश करताना जणू एखाद्या वेगळ्या विश्वात पाऊल ठेवत आहोत, अशी भावना असायची. दिवे मंद व्हायचे, पडद्यावर सेन्सॉर सर्टिफिकेट दिसायचे, आणि त्या क्षणापासून दोन-अडीच तास आम्ही वास्तव विसरून चित्रपटाच्या जगात रमायचो. लातूर शहरातील रिगल, रमा थिएटर, यशोदा थिएटर, उषाकिरण ही ठिकाणे आमच्या आठवणींची साक्ष देतात. निलंगा शहरातील अजिंठा थिएटर आणि भारत थिएटर यांनीही आमच्या आनंदाचे, टाळ्यांचे, शिट्ट्यांचे क्षण अनुभवले आहेत.

सोलापूरमध्ये प्रभात थेटर भागवत थेटर आशा थेटर इत्यादी थिएटरच्या भिंतींना आमच्या तरुणाईचा उत्साह आजही ऐकू येत असेल, असे वाटते. चित्रपट संपल्यानंतर थिएटरच्या बाहेर आलो की काही काळ आम्हीच त्या चित्रपटातील हिरो व्हायचो. चालण्यात त्याची स्टाईल, बोलण्यात त्याचा अंदाज, केसांची ठेवण, संवाद म्हणण्याची पद्धत हे सगळे नकळत अंगी यायचे. मित्रांमध्ये त्या चित्रपटावर तासन्तास चर्चा व्हायची. कोणता सीन भारी होता, कोणता डायलॉग लक्षात राहिला, हिरोने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य यावर वाद रंगायचे. त्या चर्चा म्हणजे आमच्या मैत्रीचे बंध अधिक घट्ट करणारे क्षण होते. आजच्या पिढीला चित्रपट सहज उपलब्ध आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्मवर हजारो चित्रपट एका क्लिकवर मिळतात. घरबसल्या, एकट्याने, हेडफोन लावून चित्रपट पाहता येतो. पण त्या थिएटरमधील अंधारात, शेकडो लोकांसोबत एकाच भावनेत हरवून जाण्याचा अनुभव वेगळाच होता. एखाद्या सीनवर संपूर्ण थिएटर एकाच वेळी टाळ्या वाजवते, हसते किंवा डोळे पुसते तो सामूहिक अनुभव आज क्वचितच मिळतो. ब्लॅकमध्ये तिकीट घेण्याचा थरार, रांगेतील धक्काबुक्की, मित्रांची साथ, आणि पडद्यावर दिसणाऱ्या स्वप्नांची जादू हे सगळे आता भूतकाळात जमा झाले आहे. मल्टिप्लेक्स, ऑनलाईन बुकिंग,आरक्षित जागा सगळे काही सुबक आणि सोयीचे झाले आहे. पण त्या असुविधांमध्येच एक वेगळी मजा होती. त्या अंधारात बसून स्वप्नांना उजाळा देण्याचा आनंद आजही मनाच्या कप्प्यात जपून ठेवला आहे. म्हणूनच आज ठामपणे वाटते सरला आवडता अंधार! तो अंधार केवळ थिएटरचा नव्हता; तो आमच्या तारुण्याचा, आमच्या मैत्रीचा, आमच्या भावविश्वाचा साक्षीदार होता. काळ बदलला, पद्धती बदलल्या, पण त्या काळातील आठवणींचा प्रकाश अजूनही मनात तितकाच तेजस्वी आहे. आजच्या पिढीला तंत्रज्ञानाची साथ आहे; आमच्याकडे आठवणींचा खजिना आहे. आणि त्या खजिन्यात सर्वात मौल्यवान ठेवा म्हणजे थिएटरमधील तो आवडता अंधार.

**एक काळ असा होता, जेव्हा सिनेमा हा केवळ करमणुकीचा भाग नव्हता; तो आमच्या तारुण्याचा श्वास होता. आजच्या डिजिटल युगात चित्रपट पाहणे ही सहज उपलब्ध गोष्ट झाली आहे. मोबाईलवर एक क्लिक आणि चित्रपट आपल्या हातात! पण नव्वदच्या दशकात आणि दोन हजारच्या सुरुवातीला चित्रपट पाहणे म्हणजे एक वेगळाच सोहळा असायचा. त्या काळात थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहणे हीच खरी मजा होती. आणि त्या अंधारात बसून पडद्यावर उमटणाऱ्या स्वप्नांचा अनुभव काही वेगळाच असायचा. म्हणूनच आज मनातून सहज शब्द उमटतात,सरला आवडता अंधार सरला तो सुवर्णकाळ!**



# मी माझ्या नवऱ्यापेक्षा जास्त कमावते!

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी लवकरच तिघी या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सोनाली कुलकर्णीसह या सिनेमात ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर, तसेच अभिनेत्री नेहा पेंडसे या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. आता मात्र सोनाली कुलकर्णी तिच्या अभिनयामुळे नाही, तर तिने केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेत आहे. अभिनेत्रीने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिचा नवरा, तसेच सहजीवन यांबद्दल वक्तव्य केले. जेव्हा मी लग्नाचा गांभीर्याने विचार करायला लागले, तेव्हा मुलगा कसा पाहिजे याबद्दल विचार केला. आयुष्य एवढं संकुचित नाही, त्याच्या बऱ्याच बाजू आहेत. म्हणून मी इंडस्ट्रीच्या बाहेरचा मुलगा बघत होते. त्यानंतर मी कुणालला भेटले. त्यानं मला गोष्टींकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन दिला, असं सोनाली म्हणाली. पुढे ती म्हणाली, आम्ही खूप प्रवास करतो. त्यालाही जगातल्या विविध ठिकाणी फिरायला आवडतं. मी गृहिणी म्हणून संसार आणि घराकडे बघते. आम्ही एकत्र आहोत; परंतु आमच्या आर्थिक गोष्टी वेगवेगळ्या आणि स्वतंत्र आहेत. बऱ्याचदा लोकांच्या कमेंट्स येतात किंवा सुरुवातीला खूप कमेंट्स यायच्या की बाहेरच्या देशातला आहे, तर खूप पैसा कमवणारा असेल. शेवटी मुली हेच करतात. तर मला अतिशय अभिमानानं



सांगायचं आहे की, मी माझ्या नवऱ्यापेक्षा जास्त कमावते. त्यामुळे मी त्याचे पैसे बघितलेलेच नाहीत. मला माहीत नाही की, तो किती कमावतो. नेमके पैसे मला माहीत नाहीत; पण आमच्यात ही चर्चा झाली आहे की मी त्याच्यापेक्षा जास्त कमावते. याचं त्यालाही वावगं वाटत नाही, असुरक्षितता वाटत नाही.

मलाही त्यात एक वेगळं वाटत नाही. कारण- एक वेळ अशी येणार आहे किंवा मी ठरवेन की, मला काम करायचं नाही. तेव्हा तोच कमावणार आहे. असे असले तरी आम्ही आर्थिक व्यवहार वेगळे करतो. माझे आणि त्याचे अकाउंट्स वेगळे आहेत. त्यानं आजवर कधी विचारलं नाही की, तू इतके पैसे कमावतेस, तर ते कुठे जातात. आजही माझे अकाउंट्स माझे बाबा सांभाळतात. त्यामध्ये माझ्या नवऱ्याचा किंवा सासरकडच्यांचा अजिबात हस्तक्षेप नाही. लग्नानंतर माझ्या आयुष्यात फार काही बदललं नाही. याचं श्रेय माझ्या सासरच्या लोकांना जातं. तेही तितकेच पुरोगामी विचारांचे आहेत. आम्ही जेव्हा एकत्र असतो, तेव्हा आम्ही व्यायाम करतो. पुढे ती म्हणाली, एकत्र व्यायाम करणं ही रिलेशनशिपची सगळ्यात उत्तम गोष्ट आहे. जर तुम्हाला तुमच्यातील बॉण्डिंग वाढवायचं असेल, तर एकत्र व्यायाम करा. त्यामुळे तुम्ही एकमेकांना उत्तमरीत्या पाठिंबा देऊ शकता.

# राणीचा 'मर्दानी ३' आता ओटीटीवर



अलीकडेच काही दिवसांपूर्वी चित्रपटगृहांत प्रदर्शित झालेले अनेक सिनेमे आता ओटीटीवर रिलीज होताना दिसत आहेत. अशातच आता आणखी एक चित्रपट प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे. राणी मुखर्जींची मुख्य भूमिका असलेला 'मर्दानी ३' हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. यशराज प्रॉडक्शनची निर्मिती असलेला आणि राणी मुखर्जी अभिनीत 'मर्दानी ३' हा चित्रपट ३० जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. 'वृत्तानुसार चित्रपटाने जगभरात आतापर्यंत ७५ कोटींची कमाई केली; तर देशात ६० कोटींचा गल्ला जमवला आहे. आता हा चित्रपट प्रेक्षकांना लवकरच ओटीटीवर पाहता येणार आहे. 'मर्दानी ३' हा चित्रपट २७ मार्च रोजी ओटीटीवर रिलीज होणार आहे; तर चित्रपटाचे डिजिटल हक्क ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सकडे आहेत. परंतु, चित्रपटाच्या रिलीज डेटबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. एरवी चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर ८ आठवड्यांनंतर ओटीटीवर रिलीज होतो. अभिराज मिनावाला दिग्दर्शित 'मर्दानी ३' चित्रपटात राणी मुखर्जीने पोलिस अधिकारी शिवानी शिवाजी रॉय ही भूमिका साकारली आहे. तिने नेहमीप्रमाणे तिच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. चित्रपटाच्या कथेबद्दल बोलायचं झालं तर यामध्ये ३ महिन्यांत ९३ तरुण मुली बेपत्ता होतात आणि शिवानी त्यांचा शोध घेत असते. चित्रपटाची कथा आयुष गुप्ता यांनी लिहिली आहे. राणी मुखर्जी व्यतिरिक्त या चित्रपटात जानकी बोदीवाला, जिस्सू सेनगुप्ता, इंद्रनील सेनगुप्ता यांसारखे कलाकार आहेत. माध्यमांच्या वृत्तानुसार 'मर्दानी ३'च्या बॉक्स ऑफिस कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ६०.१५ कोटींचं कलेक्शन केलं आहे आणि टोटल नेट कलेक्शन ५०.६८ कोटींचं आहे. चित्रपटाच्या ओपनिंगची सुरुवात ४ कोटींपासून झालेली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी चित्रपटाने ६.२५ कोटी, तिसऱ्या दिवशी ७.२५ कोटी आणि चौथ्या दिवशी २.२५ कोटींचं कलेक्शन केलं आहे. पहिल्या आठवड्यात चित्रपटाने एकूण २६.५ कोटी तर दुसर्या आठवढ्यात १५.६५ कोटी कमावले. 'मर्दानी ३'ने तिसऱ्या आठवड्यात ५.३५ कोटी आणि चौथ्या आठवड्यात २.५२ कोटी, तर पाचव्या आठवड्यात १.४५ कोटींचं कलेक्शन केलं. आता प्रेक्षक हा चित्रपट ओटीटीवर कधी प्रदर्शित होणार याची वाट पाहत आहेत.

# आता बॉलिवूडमध्ये ती मजाच उरली नाही



बॉलिवूडची 'बेबो' म्हणजेच अभिनेत्री करीना कपूर ही सिनेसृष्टीतील आघाडीची नायिका आहे. आपल्या अनोख्या स्टाईलने तिने लाखो चाहत्यांची मने जिंकली आहेत. साल २००० मध्ये जेपी दत्ता दिग्दर्शित रिफ्यूजी या चित्रपटातून करीनाने तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली. करीनाने तिच्या आजवरच्या कारकिर्दीत अनेक ब्लॉकबस्टर सिनेमे दिले. करीना ही इंडस्ट्रीतील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे, ज्या नेहमी ठामपणे त्यांची मतं, प्रतिक्रिया देत असतात. आपलं खासगी आयुष्य असो किंवा व्यावसायिक आयुष्य असो करीन नेहमी मनमोकळेपणाने संवाद साधताना दिसते. सध्या अभिनेत्री करीना कपूर एका मुलाखतीमुळे चर्चेत आली आहे. या मुलाखतीमध्ये तिने आताच्या काळातील चित्रपटांचे आशय आणि ट्रेंडवर भाष्य केलं आहे. सध्याच्या चित्रपटांमध्ये पूर्वी असलेली मजा ती गाणी आणि रोमान्सचा अभाव आहे, अशी स्पष्ट शब्दांत तिने प्रतिक्रिया दिली. अलिकडेच एका मुलाखतीत करीना म्हणाली, सध्याच्या काळातील चित्रपटांमध्ये थ्रिलर, गुन्हेगारी आणि रक्तपात दाखवणं या सगळ्या गोष्टींवर अधिक भर दिला जात आहे. अशा चित्रपटांमध्ये पूर्वीप्रमाणे मनोरंजन ती ऊर्जा आणि ती रंगत नाही. शिवाय रोमँन्टिक भावनांचा अभाव जाणवतो. याच गोष्टी एकेकाळी बॉलिवूडची ओळख होत्या. त्यानंतर अभिनेत्री म्हणाली,चित्रपट केवळ ॲक्शन आणि हिंसाचारापर्यंत मर्यादित नसावेत, तर प्रेम, संगीत आणि भावनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे महिलांसाठी सशक्त भूमिका असलेल्या फारशा पटकथा मिळत नाहीत. असं ठाम मत तिने या मुलाखतीत मांडलं. करीना कपूरच्या कामाच्या बाबतीत बोलायचं झालं तर, करीना कपूर लवकरच दिग्दर्शिका मेघना गुलजार यांच्या 'दायरा' या चित्रपटात दिसणार आहे. अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात मध्यवर्ती भूमिकेत दिसणार आहे.

# लोकेशच्या चित्रपटात दिसणार वामिका

तमिळ चित्रपटसृष्टीचा ब्लॉकबस्टर दिग्दर्शक लोकेश कनगरराजला मास्टर, कैथी, लियो, विक्रम आणि कूली या चित्रपटांसाठी ओळखले जाते. लोकेश आता दिग्दर्शनानंतर अभिनेता म्हणून मोठ्या पडद्यावर दिसून येणार आहे. त्याच्या अभिनयातील पदार्पणाच्या चित्रपटाचे नाव डीसी असून याची झलक सादर करण्यात आली आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत वामिका गब्बी आणि संजना कृष्णमूर्ती मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट मे महिन्याच्या आसपास प्रदर्शित होणाराह आहे. रक्तपात आणि हिंसेने भरलेल्या या चित्रपटाच्या टीझरने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. दिग्दर्शक अरुण मथेश्वरन यांनी याचीच पटकथा लिहिली आहे. मथेश्वरन याने यापूर्वी रॉकी, सानी कायधाम आणि कॅप्टन मिलर यासारखे चित्रपट दिले आहेत.



# वरुण धवन घेणार अभिनयातून ब्रेक ?



बॉलिवूड अभिनेता वरुण धवन सध्या त्याच्या आगामी चित्रपटांमुळे चर्चेत आहे. नुकताच तो सनी देओलसोबत 'बॉर्डर २' मध्ये दिसला होता. मात्र, आता वरुणच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी आहे. वरुण अभिनयातून एक मोठा ब्रेक घेण्याच्या तयारीत आहे. वरुणची भूमिका असलेला 'बॉर्डर २' सिनेमा चांगलाच यशस्वी झाला. त्यानंतर वरुणने हा निर्णय घेतल्याचं समजतंय. गेल्या काही वर्षांपासून वरुण सतत शूटिंगमध्ये व्यग्र आहे. वृत्तानुसार, वरुणला काही काळ कामातून लांब राहायचे आहे. यामागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे, वरुणला त्याच्या कुटुंबासोबत, विशेषतः त्याची मुलगी लारासोबत जास्तीत जास्त वेळ घालवायचा आहे. आपल्या मुलीच्या बालपणातील महत्त्वाचे क्षण वरुणला चुकवायचे नाहीत. म्हणून वरुण काही काळ सिनेमांपासून दूर राहणार असल्याचं समजतंय. वरुण धवन सध्या त्याच्या आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची वाट पाहत आहे. हा चित्रपट सुरुवातीला ५ जून रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु यशच्या 'टॉक्सिक' चित्रपटाशी होणारी टक्कर टाळण्यासाठी आता तो १२ जून रोजी प्रदर्शित केला जाणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन त्याचे वडील डेव्हिड धवन यांनी केले असून यामध्ये पूजा हेगडे, मृणाल ठाकूर आणि चंकी पांडे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. २०१२ मध्ये 'स्टुडंट ऑफ द इयर' मधून पदार्पण करणाऱ्या वरुणने 'बदलापूर', 'ऑक्टोबर', 'जुडवा २', 'भेडिया' यांसारख्या अनेक हिट चित्रपटांतून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. नुकताच त्याने आयुष्मान खुरानाच्या 'थामा' चित्रपटात पाहुणा कलाकार म्हणून छोटी भूमिकाही साकारली होती. वरुणचा 'बॉर्डर २' सुद्धा हिट झाल्याने तो सध्या आनंदात आहे.



# हरुण ग्लोबल रिच लिस्टमध्ये शाहरुख

शाहरुख खान बॉलीवूडमधील श्रीमंत सेलिब्रिटींपैकी एक आहे. अशातच माहितीनुसार शाहरुख बॉलीवूडमधील सर्वात श्रीमंत अभिनेता बनला आहे. शाहरुख चित्रपटांसाठी कोट्यवधींमध्ये मानधन घेतो. 'हरुण ग्लोबल रिच लिस्ट'नुसार शाहरुख जगातील सर्वात श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक ठरला आहे. ३०८ अब्जाधीशांसह भारत या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीतील माहितीनुसार अभिनेत्याची नेटवर्थ १०,८०० कोटी इतकी आहे. या यादीत इतर सेलिब्रिटींमध्ये टेलर स्विफ्ट (१.६ अब्ज अमेरिकन डॉलर) आणि रिहाना(१.५ अब्ज अमेरिकन डॉलर) यांचा समावेश आहे. तसेच क्रीडा क्षेत्रातील दिग्गज मायकेल जॉर्डन (३.६ अब्ज अमेरिकन डॉलर) आणि टायगर वूड्स (१.९ अब्ज अमेरिकन डॉलर) यांचाही समावेश आहे. शाहरुख पुन्हा एकदा या यादीत स्थान मिळवण्यात यशस्वी झाला असला तरी यावेळी त्याच्या संपत्तीत किंचित घट झाली आहे. गेल्या वर्षी त्याची संपत्ती १२,४९० कोटी रुपये म्हणजेच सुमारे १.४ अब्ज डॉलर इतकी असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. गेल्या वर्षी शाहरुख खानची संपत्ती टेलर स्विफ्ट हिच्यापेक्षाही जास्त होती. २०२५ मध्ये टेलर स्विफ्टची एकूण संपत्ती सुमारे १.३ अब्ज डॉलर इतकी होती. मात्र, यावर्षी टेलर स्विफ्ट ही शाहरुखपेक्षा पुढे आहे. शाहरुखबरोबर रणबीर कपूर अभिनीत 'रामायण' चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा यांचाही या यादीत समावेश आहे. त्यांनी यावर्षी या यादीत पहिल्यांदाच स्थान मिळवलं असून, त्यांची संपत्ती १ अब्ज डॉलर (सुमारे ९,२०४ कोटी रुपये) इतकी आहे. दरम्यान, मुकेश अंबानी हे ९.८ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह अजूनही भारतातील सर्वात श्रीमंत उद्योगपती आहेत आणि जागतिक स्तरावर त्यांचा क्रमांक १७ वा आहे, तर गौतम अदानी हे ७.५ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असून जागतिक स्तरावर त्यांचा क्रमांक २३ वा आहे.

# अनीत पड्डा साकारणार मधुबाला

मधुबाला म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेलं एक सुरेख स्वप्न. आजच्या पिढीला कदाचित हे वाचून आश्चर्य वाटेल मधुला पडद्यावर पाहतानाच नव्हे तर त्यांच्या उल्लेखानेही रोमांचित होणारे हजारो रसिक होते. गेल्या काही काळापासून प्रसिद्ध अभिनेत्री मधुबाला यांच्या जीवनावर आधारित बायोपिकबद्दल हिंदी सिनेसृष्टीत सतत चर्चा सुरू आहेत. मात्र, पडद्यावर मधुबाला यांची भूमिका कोण साकारणार याचं उत्तर अद्यापही अनुत्तरीत आहे.

गेल्या वर्षभरापासून अभिनेत्री किआरा अडवाणी मधुबाला यांच्या भूमिकेत झळकणार असल्याच्या बातम्या होत्या. मात्र, आता या बायोपिकमध्ये किआरा नव्हे एक नवा चेहरा दिसणार असल्याची माहिती आहे. आपल्या सौंदर्याने आणि सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर दीर्घकाळ राज्य करणाऱ्या या नायिकेच्या जीवनावर आधारित चित्रपट बनणार असल्याच्या चर्चा आहेत. विशेष म्हणजे बॉलिवूडचे लोकप्रिय दिग्दर्शक संजय लीला भन्साली मधुबाला यांच्या बायोपिकचं दिग्दर्शन करणार असल्याचं म्हटलं जात आहे. याशिवाच चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर त्यामध्ये अभिनेत्री किआरा अडवाणी मधुबाला यांच्या भूमिकेत झळकणार असल्याची बातम्या येत होत्या. त्यात आता या संदर्भात एक महत्त्वाची अपडेट मिळते आहे. अलिकडेच काही रिपोर्टमध्ये असा दावा करण्यात आला की मधुबाला यांच्या भूमिकेसाठी किआरा नव्हेतर अभिनेत्री अनीत पड्डाचं नाव फायनल करण्यात आलं आहे. परंतु, या सगळ्या अफवा असल्याचं यशराज फिल्म्सकडून सांगण्यात येत आहे. रिपोर्टनुसार, या सगळ्या अफवा असून याबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. चित्रपटात अनित पड्डाला कास्ट केल्याचे दावे खोटे आहेत, असं यशराज फिल्म्सकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे मधुबाला यांची भूमिका पडद्यावर कोण साकारणार ही माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. दरम्यान, अनित पड्डाने यापूर्वी शक्ती शालिनी या चित्रपटात कियारा अडवाणीला रिप्लेस केलं होतं. वृत्तानुसार, कियारा अडवाणी सुरुवातीला शक्ती शालिनी मध्ये काम करणार होती, परंतु तिच्या व्यस्त वेळापत्रकामुळे तिने या प्रोजेक्टमधून माघार घेतली. त्यानंतर अनित पड्डाला त्या भूमिकेसाठी कास्ट करण्यात आलं.

